# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड** **दिनांक १६/०७/२०१८**

## १) घरफोडी :-

**अ) हिमायतनगर :-** दिनांक १४.०७.२०१८ रोजी चे १०.०० ते दि.१५.०७.२०१८ चे ०२.०० वा.चे दरम्यान परमेश्वर कमानी जवळ हिमायतनगर, जि.नांदेड येथे यातील नमुद ठिकाणी कोणीतरी अज्ञात चोरटयाने मेडीकल दुकानाचे शटर व कुलुप तोडुन आत प्रवेश करुन मेडीकल मधील कॅाऊंटर चे गल्याचे लॉक तोडुन नगदी ३,५००/- रुपये व सी.सी.टी.व्ही.हाईक विशन कंपनीचा कॅमेरा अंदाजे किंमत ४,०००/- रुपये असा एकुण ७,५००/- रुपयाचा माल चोरुन नेला. वगैर **फिर्यादी प्रभाकर तुकाराम चव्हाण, वय ४३ वर्षे व्यवसाय व्यापार रा.हिमायतनगर, जि.नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.हिमायतनगर** गुरनं. १०१/२०१८ कलम ४५७, ३८० , ३४ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/२०७८ लक्षटवार, मो.नं. ९७६७११४७२०** हे करीत आहे.

**ब) मुखेड :-** दिनांक १४.०७.२०१८ रोजी चे २०.०० ते दि.१५.०७.२०१८ चे ०६.०० वा.चे दरम्यान वाल्मीकनगर मुखेड, जि.नांदेड येथे यातील नमुद ठिकाणी कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे घरात प्रवेश करुन रुमचे दाराचे कुलुप काढुण कपाटातील सामान अस्थाव्यस्त फेकुन चोरी प्रयत्न केला. वगैर **फिर्यादी जिलानी मेहबुब साहाब शेख, वय ५८ वर्षे व्यवसाय व्यापार रा.वाल्मीकनगर मुखेड, जि.नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.मुखेड** गुरनं. १०३/२०१८ कलम ४५७, ३८० , ५११ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/गिरी, मो.नं. ९४२१३८०००२** हे करीत आहे.

## २) मो. सा.चोरी :-

**इतवारा :-** दिनांक ०५.०७.२०१८ चे २३.०० ते दि.०६.०७.२०१८ चे ०९.०० वा. चे दरम्यान फिर्यादीचे घरासमोर बागवान कॉलनी देगलुर नाका, नांदेड येथे यातील फिर्यादीची हिरो होन्डा स्प्लेंडर कंपनीची मो. सा. क्रंमांक एम.एच.२२/एल.६८८७ अंदाजे किंमत २०,०००/-रुपयाची आज्ञात चोरटयाने चोरुन नेली वगैरे **फिर्यादी मो.सलीम मो.युसुब, वय ५८ वर्षे व्यवसाय फळ विक्रेता रा.बागवान कॉलनी देगलुर नाका, जि.नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.इतवारा** गुरनं २२५/२०१८ कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/२३२० शिंदे, मो.क्र. ९८२३६३३८२०** हे करीत आहेत.

## ३) विवाहितेचा छळ :-

**भाग्यनगर :-** दिनांक ०१.०३.२०१७ ते दि.१०.०७.२०१८ चे ०९.०० वा. चे दरम्यान पावडेवाडी नाका, नांदेड येथे यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीबाईचे माहेरीहुन ५,००,०००/- रुपये घवुन ये म्हणुन तिस थापड-बुक्याने मारहान करुन, उपाशी पोटी ठेवुन, शिवीगाळ करुन, मानसिक व शारिरीक छळ करुन,तिस माहेरी नेऊन सोडले व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **३० वर्षीय वय असलेल्या महिला फिर्यादीने** दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे.भाग्यनगर** गुरनं. २२२/२०१८ कलम ४९८(अ), २९२, ३२३, ५०४, ५०६, ३४ भादविप्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/२१८७ आलेवार, मो.क्र. ९१५८७५६०८७** हे करीत आहेत.

## ४) पळवून नेले :-

**धर्माबाद :-** दिनांक १४.०७.२०१८ रोजी १७.०० वा.चे सुमारास पाटोदा (खु), आरोपीचे घरी, ता.धर्माबाद नांदेड येथे यातील **फिर्यादी नामे संजय पांडुरंग ईमनेलु, वय ३७ वर्षे व्यवसाय सरपंच रा.पाटोदा (खु), ता.धर्माबाद जि.नांदेड** यास यातील नमुद आरोपीने फिर्यादीस ग्रामपंचायीत निवडणुकीत झालेला २,००,०००/- रुपये खर्च दे किंवा संरपच पदाचा राजीनामा दे म्हणुन जीपमध्ये पळवुन नेले. वगैरे **फिर्यादी संजय पांडुरंग ईमनेलु, वय ३७ वर्षे व्यवसाय सरपंच रा.पाटोदा (खु), ता.धर्माबाद जि.नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पो.स्टे.धर्माबाद** गुरनं १६४/२०१८ कलम ३६३ भादंविप्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/सनगले, मो. नं. ९८२३८६४०५८** हे करीत आहेत.

## ५) आर्मस् ॲक्ट :-

**अ) वजिराबाद :-** दिनांक १५.०७.२०१८ रोजी १५.३० वा.चे सुमारास गुरुद्वारा गेट नं.०२ कलगीधर गीफट सेंटर वजिराबाद, नांदेड येथे यातील नमुद आरोपीने विनापरवाना बेकायदेशिररित्या ०५ तलवारी व ०३ खंजर बाळगुन मिळुण आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/किरण सुरेश पठारे, ने.पो.स्टे.वजिराबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पो.स्टे.वजिराबाद** गुरनं १९४/२०१८ कलम ४/२५ भा.ह.का. प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/१०९८ गजानन किडे, मो.क्र. ०२४६२-२३६५००** हे करीत आहेत.

**ब) नांदेड ग्रामीण :-** दिनांक १५.०७.२०१८ रोजी १८.०५ वा.चे सुमारास बळीरामपुर, नांदेड येथे यातील नमुद आरोपीने विनापरवाना बेकायदेशिररित्या खंजर बाळगुन मिळुण आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/गजानन काळबा मोरे, ने.पो.स्टे.नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पो.स्टे.नांदेड ग्रामीण** गुरनं ३२०/२०१८ कलम ४/२५ भा.ह.का. प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास मपोउपनि/कदम मॅडम, मो.क्र. ०२४६२-२६३३७३** हे करीत आहेत.

## ६) बेकायदेशिररित्या विदेशी दारु बाळगुन मिळुन आला :-

**नांदेड ग्रामीण :-** दिनांक १५.०७.२०१८ चे १३.४५ वा. चे सुमारास असर्जन नाका रोड, नांदेड येथे यातील नमुद आरोपीने विना परवाना बेकायदेशिररित्या विदेशी दारुचे १८० एम.एल. च्या १८ शिलबंद बॉटल अंदाजे किंमत २,५२०/- रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वैगेरे **फिर्यादी पोउपनि/गजानन काळबा मोरे, ने.पो.स्टे.नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.नांदेड ग्रामीण** गुरन ३१८/२०१८ कलम ६५ (ई), मुप्रोका प्रमाणे गन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/१८८२ सुर्यवंशी , मो.क्र. ०२४६२-२६३३७३** हे करीत आहेत.

## ७) बेकायदेशिररित्या देशी दारु बाळगुन मिळुन आला :-

**अ) नांदेड ग्रामीण :-** दिनांक १५.०७.२०१८ चे १२.१० वा. चे सुमारास ढवळे कार्नर हिरो होन्डा मो.सा.शोरुम जवळ, नांदेड येथे यातील नमुद आरोपीने विना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारु भिंगरी संत्राचे १८० एम.एल. च्या ३० शिलबंद बॉटल अंदाजे किंमत ४,२००/- रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वैगेरे **फिर्यादी पोउपनि/गजानन काळबा मोरे, ने.पो.स्टे.नांदेड ग्रामीण** यानी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.नांदेड ग्रामीण** गुरन ३१६/२०१८ कलम ६५ (ई), मुप्रोका प्रमाणे गन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/१८८२ सुर्यवंशी , मो.क्र. ०२४६२-२६३३७३** हे करीत आहेत.

**ब) रामतिर्थ :-** दिनांक १५.०७.२०१८ चे २०.३० वा. चे सुमारास पाचपिपळी फाटा जवळ, ता.बिलोली जि.नांदेड येथे यातील नमुदआरोपीने विना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारु भिंगरी संत्राचे १८० एम.एल. च्या ३० शिलबंद बॉटल अंदाजे किंमत १,५००/- रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वैगेरे **फिर्यादी सपोनि/अशोक तुकाराम जाधव, ने.पो.स्टे.रामतिर्थ** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.रामतिर्थ** गुरन ११२/२०१८ कलम ६५ (ई), मुप्रोका प्रमाणे गन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/१६३६ निरदोडे , मो.क्र. ०२४६५-२६७१०१** हे करीत आहेत.

## ८) बेकायदेशिररीत्या मोहफुल रसायन बाळगुन मिळुन आला :-

**माहुर :-** दिनांक १५.०७.२०१८ रोजी चे १६.०५ वा. चे सुमारास लखमापुर तांडा, ता.माहुर जि.नांदेड येथे यातील नमुद आरोपीने विनापरवाना बेकायदेशिररित्या मोहफुल रसायन ५० लीटर अंदाजे किंमत २,०००/- रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याच्या उददेशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला, वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/२९१६ प्रभाकर नामदेव करेवाड, ने.पो.स्टे.माहुर** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.माहुर** गुरन ८७/२०१८ कलम ६५ (ई), महाराष्ट्र प्रो.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/७६४ राठोड , मो.क्र. ९४०५६९७६४** हे करीत आहेत.

## ९) पाण्यात पडुन बुडून मृत्यु :-

**किनवट :-** दिनांक १३.०७.२०१८ रोजी चे ०५.०० वा. चे सुमारास पैनगंगा नदी पात्रात मलकापुर खेर्डा, ता.किनवट जि.नांदेड येथे यातील **मयत नामे रामराव गणपत राठोड, वय ४५ वर्षे रा.मलकापुर खेर्डा, ता.किनवट जि.नांदेड** हा नदी पात्राचे पाण्यातुन जात असतांना पाण्यात बुडून मरण पावला. **खबर देणार वसंत गणपत राठोड, वय ४० वर्षे रा.मलकापुर खेर्डा, ता.किनवट जि.नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.किनवट** आ.मृ २२/२०१८ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ.म्र. दाखल असुन **तपास पोना/२२०१ शकील, मो.क्र. ९८८१७२५३३८** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४.

**दि. १६.०७.२०१८**

# <u>प्रेस नोट</u>

**<u>विषय :</u>- मुले पळविणाऱ्या टोळीच्या अफवांवर करण्यात आलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजना.**

महाराष्ट्रात नागपुर, धुळे, नंदुरबार, औरंगाबाद परिक्षेत्रात, औरंगाबाद ग्रामीण, जालना, उस्मानाबाद तसेच नांदेड परिक्षेत्रात लातुर जिल्हयाचे काही ठिकाणी कामानिमीत्त फिरणाऱ्या नागरीकांवर ते चोर आहेत या शंकेवरुन पो. स्टे. वैजापुर हद्दीत हत्येच्या व इतर ठिकाणी माहरहाणीचे प्रकार घडलेले आहेत. वृत्तपत्रे, निवेदने आणि विविध समाज माध्यमातुन या बाबत तीव्र भावना व्यक्त होत आहेत.

महाराष्ट्र हे पुरोगामी आणि विविध व वैशिष्टयपुर्ण संस्कृतीप्रधान राज्य आहे. महाराष्ट्रात पारंपारिक संस्कृतीनुसार विविध समाजाचे लोक हे आपले कौशल्य व कलागुणांच्या आधारे उदरनिर्वाह करत असतात हे व्यवसाय करतांना त्यांना गावोगावी फिरावे लागते या फिरस्तीच्या काळात त्यांचेवर निराधार अफवांच्या आहारी जाऊन हल्ले होत आहेत. अशा घटना मानवतेला व पुरोगामी महाराष्ट्राच्या परंपरेला काळीमा फासणाऱ्या आहेत त्यामुळे या समाजात भितीचे वातावरण निर्माण झाले होते. विविध समाज माध्यमातुन जनजागृतीच्या आधारे समाज प्रबोधन व संवेदनशीलता जागृत करणे आवश्यक आहे.

सदर गोष्टीचे गार्भीय लक्षात घेता नांदेड परिक्षेत्रातील सर्व पोलीस अधीक्षक यांच्याकडुन त्यांच्या कार्यक्षेत्रात जनजागृती करणारे चित्रफित (व्हिडीओ) व ऑडीओ संदेश व्हॉट्सअॅप, फेसबुक तसेच इतर सोशल मिडीयावर प्रसारित करणे सुरु असुन कार्यक्षेत्रात भरणाऱ्या आठडी बाजारांमध्ये लाऊडस्पीकरने जनजागृती देखील करण्यात येत आहे. पोलीस अधीक्षक यांच्या अधिपत्याखालील उप-विभागीय पोलीस अधिकारी व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांचे मार्फत पोलीस पाटलांच्या बैठकी आयोजीत करुन गावामध्ये जनजागृती करीत आहोत. त्यासाठी इतर प्रशासकीय कार्यालयाची देखील मदत घेतली जात आहे. जनजागृती करणारे भितीपत्रके दर्शनी भागात लावण्यात येत आसुन जनजागृतीचे संदेश स्थानिक वर्तमानपत्रे , केबल चॅनल, एफ.एम.रेडीओ आणि रेडीओ स्टेशवर प्रसारित करण्यात येत आहे.

वरील सर्व उपाययोजना राबवुन देखील सोशल मिडीयावर आफवा पसरविणाऱ्या इसमा विरुध्द पोलीस ठाण्यामध्ये गुन्हे दाखल करणे बाबत चे आदेश निर्गमीत करण्यात आलेले आहेत. तरी सर्वाना आवाहन करण्यात येते की, सोशल मिडीयावर येणाऱ्या आफवावर विश्वास ठेवु नये कायदा हातात घेवु नये. जर कोणाला अशा माहीती प्राप्त झाल्यास ताबडतोब जवळच्या पोलीस ठाण्यास कळवावे त्यावर त्वरीत कारवाई केली जाईल.

**(डॉ.सुहास वारके)**
विशेष पोलीस महानिरीक्षक
नांदेड परिक्षेत्र, नांदेड